## प्रकरण चौथे :-

# "दलित कामगार व दलित यंत्रमागधारकांची शैक्षणिक परिस्थिती व आर्थिक आणि सामाजिक संबंध".

## -: प्रकरण चौथे :-

आमच्या निरिक्षणातून असे दिसून आले की, इचलकरंजीतील यंत्रमाग व्यवसायात दलितांचा सहभाग दोन प्रकारचा आहे. एक म्हणजे कामगार म्हणून व दुसरा म्हणजे यंत्रमागधारक [मालक] म्हणून. इचलकरंजी - परिसरातील लोकांनी विशेषत: दलितांनी हाच व्यवसाय कां निवडला ? ह्या प्रश्नाचे उत्तर मुलाखती देणा-यांनी वेगवेगळ्या प्रकाराने दिल्याचे आपणांस दिसून येते. एक म्हणजे इचलकरंजीतील यंत्रमाग व्यवसाय हा सतत वाढत चालला आहे. त्यामुळे या धंद्यात नवीन होतकरू उद्योजकांना वाव आहे. त्यामुळे दलितांनी या व्यवसायात प्रवेश केला. दुसरे महत्वाचे कारण म्हणजे दलित समाजात असलेली बेकारीसुध्दा यंत्रमागासारख्या स्वतंत्र स्वरूपाचा व्यवसाय सुरु करण्यास कारणीभूत ठरली. असे आमच्या लक्षात आले. तिसरे कारण म्हणजे ह्या व्यवसायात प्रशिक्षणाची आवश्यकता नाही. कामाची माहिती करून घेऊन कौशल्य वाढविले की, कोणालाही या व्यवसायात प्रगती करता येते. हे आपणांस खालील तक्ता क्र. ४ वरून दिसून येईल.

### -: तक्ता क्र. ४ :-

### -: दलित कामगारांची शैक्षणिक पात्रता :-

| गट | शिक्षण | कामगारांचे प्रमाण |
|---|---|---|
| अ | अशिक्षित | २६% |
| ब | प्राथमिक | ४९% |
| क | माध्यमिक | २०% |
| ड | महाविद्यालयीन | ५% |

तक्ता क्रमांक ४ वरून आपणांस असे दिसून येते की, "अ" गटामधील अशिक्षित कामगारांचे प्रमाण २६% आहे. "ब" गटामध्ये प्राथमिक शिक्षण घेतलेले कामगार आहेत. ते ४९% आहेत. "क" गटातील कामगारांनी माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षण घेतले आहे. ते २०% आहेत. महाविद्यालयीन शिक्षण घेतलेले दलित कामगार कमी आहेत. ते ५% आहेत. म्हणजे यंत्रमाग चालविण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण पूर्ण करणे गरजेचे नाही हे आपल्या लक्षात येते.

यानंतर कामगारापासून यंत्रमागधारक बनलेले जे दलित उद्योजक आहेत त्यांच्या शैक्षणिक पात्रतेविषयी माहिती घेणे उद्बोधक ठरेल.

-: तक्ता क्र. ५ :-

-: दलित यंत्रमागधारकांची शैक्षणिक पात्रता :-

| गट | शिक्षण | यंत्रमागधारकांचे प्रमाण |
|---|---|---|
| अ | अशिक्षित | २३% |
| ब | प्राथमिक | ३८% |
| क | माध्यमिक | २७% |
| ड | महाविद्यालयीन | १२% |
| इ | औद्योगिक प्रशिक्षण [आय.टी.आय.] | ०% |

तक्ता क्र.५ वरून असे दिसून येते की, "अ" गट अशिक्षितांचा असून त्याचे प्रमाण २३% आहे. "ब" गट प्राथमिक शिक्षण घेतलेल्या दलित यंत्रमागधारकांचा असून त्याचे प्रमाण ३८% आहे. "क" गट माध्यमिक

शिक्षणाचे प्रमाण दर्शविते. ते २७% आहे. "ड" गट महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या दलित यंत्रमागधारकांचा असून त्याचे प्रमाण १२% आहे. "इ" गट औद्योगिक प्रशिक्षणाचा असून त्याचे प्रमाण ०% आहे.

दलित यंत्रमाग कामगार व यंत्रमागधारक यांच्यातील अशिक्षितांचे प्रमाण पाहता दलित यंत्रमाग कामगारांमध्ये अशिक्षितांचे प्रमाण जास्त आहे. तसेच महाविद्यालयीन शिक्षण घेतलेले यंत्रमागधारकांची संख्या महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या कामगारांपेक्षा जास्त आहे. या व्यवसायामध्ये शिक्षणाचे सुध्दा महत्त्व आहे. कारण शैक्षणिक पात्रता असलेल्या कामगाराला आपल्या हक्काची जाणीव असते. कायद्याविषयी माहीती असते. कामगाराबरोबरच यंत्रमागधारकांनाही शिक्षणाची गरज आहे. कारण त्यांच्याजवळ जर शैक्षणिक पात्रता नसेल तर पेढीवाल्यांकडून त्यांची फसवणुक होण्याची शक्यता असते. अशा घटना अशिक्षित दलित यंत्रमागधारकांच्या बाबतीत घडल्या आहेत.

यंत्रमाग व्यवसायात दलित यंत्रमागधारकांच्या मागांची संख्या वेगवेगळी असलेली दिसून येते.

-: तक्ता क्र. ६ :-

-: मागांची संख्या दर्शविणारा तक्ता :-

| गट | मागांची संख्या | मागधारक |
|---|---|---|
| अ | दोन माग | १३% |
| ब | चार माग | ३२% |
| क | सहा माग | ५% |
| ड | आठ माग | २५% |
| इ | दहा आणि त्यापेक्षा जास्त | २५% |

मागांच्या संख्येचा विचार करता चार माग असलेल्या दलितांचे प्रमाण ३२% असून ते सर्वात जास्त आहे. त्यानंतर आठ माग व दहा आणि त्यापेक्षा जास्त माग असलेल्या दलितांचे प्रमाण २५% असलेले दिसते. त्यानंतर दोन माग असलेले दलित मागधारक १३% तर सहा माग असलेले दलित यंत्रमागधारक ५% असलेले दिसून येतात.

या यंत्रमाग उद्योगातून मिळालेल्या उत्पन्नाचा विचार करणे येथे महत्त्वाचे आहे.

-: तक्ता क्र. ७ :-

* दलित यंत्रमागधारकांच्या उत्पन्नाची गटवार विभागणी *

| गट | मासिक उत्पन्न [रुपये] | | मागधारक |
|---|---|---|---|
| अ | १,००० ते ४,०००/- | .. | ५०% |
| ब | ४,००० ते ८,०००/- | .. | ३९% |
| क | ८,००० ते १२,०००/- | .. | ७% |
| ड | १२,००० ते १६,०००/- | .. | ४% |

तक्ता क्रमांक ७ मधील मासिक उत्पन्नाचा विचार करता १,०००/- ते ४,०००/- पर्यंत उत्पन्न असणारे दलित यंत्रमागधारक ५०% असलेले दिसून येतात. त्याखालोखाल "ब" या ४,०००/- ते ८,०००/- या उत्पन्नाच्या गटातील मागधारक असून त्याचे प्रमाण ३९% असलेले दिसून येते. ८,०००/- ते १२,०००/- उत्पन्न असणारे दलित यंत्रमागधारक ७% आहेत. तर १२,०००/- ते १६,०००/- उत्पन्न असणारे दलित यंत्रमागधारक ४% असलेले दिसून येतात.

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

यंत्रमागधारकांच्या मागांच्या संख्येवर त्याचे उत्पन्न अवलंबून असते. साधारणपणे दलित यंत्रमागधारकांच्या बाबतीत असे दिसून येते की, दहा किंवा त्यापेक्षा जास्त यंत्रमाग असलेल्या दलित यंत्रमागधारकांचे प्रमाण २५% आहे. तर दोन पासून आठपर्यंत माग असणारे यंत्रमागधारक - दलितांमध्ये ७५% आहेत.

म्हणजेच दलितांमध्येही मोठे यंत्रमागधारक [सटवाले] कमी प्रमाणात असलेले दिसतात. तर छोटे यंत्रमागधारक [सट नसलेले] जास्त असलेले दिसून येतात. दलितेतर यंत्रमागधारकांप्रमाणेच दलितांमध्येही दोन प्रकारचे मालक आहेत. सटवाले जे आहेत ते आर्थिक दृष्टीकोनातून स्वयंपूर्ण आहेत. तर छोटे ज्यांना खर्चीवाले म्हणतात ते पेढीवाल्यांवर अवलंबून असलेले दिसतात.

दलित यंत्रमागधारकांच्या कारखान्यात काम करणारे कामगार आपली आर्थिक स्थिती सुधारावी असा प्रयत्न करतात. दलित कामगारांच्या उत्पन्नाचे प्रमाण कसे आहे हे पाहण्यासाठी तक्ता क्र.८ पाहणे आवश्यक आहे.

-/ तक्ता क्रमांक ८ /-

-* दलित यंत्रमाग कामगारांच्या मासिक उत्पन्नाची टक्केवारी *-

| गट | मासिक उत्पन्न [रुपये] | | कामगार |
|---|---|---|---|
| अ | ५०० - ७०० | .. | ४६% |
| ब | ७०० - ९०० | .. | ३७% |
| क | ९०० - १००० | .. | १७% |

तक्ता क्र.८ वरून आपणांस असे दिसून येते की, "अ" गटामध्ये ५०० ते ७०० इतके मासिक उत्पन्न असलेल्या दलित कामगारांची टक्केवारी ४६% एवढी आहे. जी सर्वाधिक आहे. "ब" गटातील ७०० ते ९०० मासिक उत्पन्न असलेल्या कामगारांची टक्केवारी ३७ एवढी आहे. "क" गटातील दलित कामगारांचे मासिक उत्पन्न ९०० ते १००० असून त्यांची टक्केवारी १७ असलेली आपणांस वरील तक्त्यावरून दिसून येते.

उपरोक्त तक्त्यावरून आपणांस यंत्रमाग उद्योगातील दलित कामगार व दलित यंत्रमागधारक यांच्या शैक्षणिक व आर्थिक परिस्थितीची कल्पना येते. आर्थिक परिस्थितीचा विचार करता अनेक बारकावे ध्यानात घ्यावे लागतात.

आमच्या पाहणीतून असे दिसून येते की, एकाच व्यक्तिच्या - मालकीचे जास्त माग असले तरी कागदोपत्री तसे दाखविले जात नाही. एखाद्या मोठ्या कारखान्यातील स्थिती पाहिली तर असे दिसते की, प्रत्येक मागावर वेगवेगळ्या नांवाच्या पाट्या लावलेल्या दिसतात. प्रत्येक - मागावर टेक्समार्क लागतो. टेक्समार्क म्हणजे मागाचा परवाना. ४-४ मागांचे युनिट करून ते माग घरातील प्रत्येक व्यक्तिच्या नांवावर लावले जातात. वास्तविक हे माग एकाच कारखान्यात, एका शेडखालीच असतात. विजेचे कनेक्शन एकच असते. दिवाणजी व जॉबर एकच असतात. फक्त कागदोपत्री वेगवेगळी युनिटस् दाखविली जातात.

असे करण्यामागचे कारण म्हणजे फॅक्टरी ॲक्ट लागू नये, कारण फॅक्टरी ॲक्ट लागू झाला तर कामगारांसाठी वेगवेगळ्या सोई सुविधा

DR. BALASAHEB ... SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

कराव्या लागतात. उदा. पंख्याची सोय, भरपूर उजेड, दोन मागामध्ये योग्य अंतर असणे, सॅनिटरीच्या सोई, मागांसाठी सुरक्षिततेचे उपाय योजणे [सेफ गार्ड लावणे], वस्तुस्थिती पाहता, येथे असे दिसून येते की, कमीत कमी जागेत जास्तीत जास्त माग बसवले जातात. यंत्रमाग अगदी दाटीवाटीने उभे असल्यामुळे अपघात होत असतात. माग जुने असल्यामुळे सुरक्षिततेचे उपाय म्हणजे सेफ गार्ड बसवलेले नसतात. कांही अपघात झाले तर कामगारांना सहजासहजी नुकसान भरपाई मिळत नाही. फॅक्टरी ॲक्ट नुसार तीन पाळयात काम चालत नाही, तर १२-१२ तासांच्या दोनच पाळया चाललेल्या दिसतात. तसेच कायद्यानुसार दोन मागावर एक कामगार काम करणे आवश्यक आहे. तर प्रत्यक्षात चार मागावर एक कामगार काम करतांना दिसतो.

अशाप्रकारे फॅक्टरी ॲक्टच्या कोणत्याही सोई सुविधा यंत्रमागधारक करीत नाहीत. त्यामुळे कामगाराचे आरोग्य धोक्यात येते. यंत्रमागांच्या आवाजामुळे बहिरेपणा येतो. १२-१२ तास कोंदट जागेत उभे राहिल्यामुळे व सुताचे कण श्वासावाटे फुप्फुसात गेल्यामुळे टी.बी. सारखे रोग येथील कामगारांना झालेले दिसतात. कारखानदार त्यांना कोणतीही वैद्यकीय मदत करीत नाहीत.

किमान वेतनाचा कायदा जरी शासनाने यंत्रमागाकरिता केलेला असला तरी काटेकोरपणे त्याची अंमलबजावणी होतांना दिसत नाही. कामगारांना कोणत्याही प्रकारची आर्थिक हमी दिली जात नाही. कामाचे स्वरुप कायम नसते. पगारी रजा दिली जात नाही. प्रॉव्हीडंट फंड व ग्रॅच्यूईटी नाहीत. दिवाळीच्या वेळी बोनस दिला जातो. परंतु

तोही मालकाच्या इच्छेनुसार कमी जास्त असू शकतो. खरे पाहता वर्षभरा-तील पगारी रजेचे पैसेच बोनस म्हणून दिले जात असतात.

मालक किमान वेतन का देत नाहीत याचे कारण म्हणजे शासनाने धोरण म्हणून ते स्विकारलेले नाही. तसेच छोटया यंत्रमागधारकांना पुढे करुन मोठे यंत्रमागधारक ते टाळण्याचा प्रयत्न करतात. कारण छोटा यंत्रमागधारक मालक असूनही त्याला कामगाराबरोबर यंत्रमागावर पाळी करावी लागते. कामगारापेक्षा त्याची आर्थिक स्थिती फारशी चांगली नसते.

आर्थिक स्थैर्य आल्यानंतर कामगारच छोटे मालक बनलेले दिसून येतात. काही दलित यंत्रमागधारक सटवाले म्हणजे मोठे मालकही बनलेले दिसून येतात. पूर्वी कामगार असतांना कामगार संघटनेतून ते काम करीत असत. परंतु आज यंत्रमागधारक म्हणून यंत्रमागधारक संघटनेमध्ये ते आहेत, असे दिसते. कामगारातून मालक या भूमिकेमध्ये त्यांनी पदार्पण केले हे महत्त्वाचे परिवर्तन घडून आलेले आहे.

दलित यंत्रमागधारक वेगवेगळया जातीतून आलेले दिसतात.

-/ तक्ता क्रमांक ९ /-

-: यंत्रमागधारकांची जातीनिहाय टक्केवारी :-

| अ.क्र. | पोटजात | मागधारक संख्या [टक्केवारी] |
|---|---|---|
| १. | महार | ५७% |
| २. | मांग | २% |
| ३. | चांभार | २३% |
| ४. | ढोर | ८% |
| ५. | कोरवी/कैकाडी | १०% |
| ६. | नवबौध्द | ०% |

तक्ता क्र.९ वरुन असे दिसते की, दलितांमधील महार या जातीचे प्रमाण यंत्रमाग व्यवसायात सर्वाधिक म्हणजे ५७% असलेले दिसून येते. कारण या जातीचा पारंपारिक व्यवसाय कसबी स्वरुपाचा नव्हता. त्यामुळे त्याचे प्रमाण इतर जातीपेक्षा जास्त आहे. त्यानंतर चांभार जातीचे यंत्रमागधारक २३% असलेले दिसतात. कोरवी/कैकाडी १०%आहेत. तर ढोर ८% आहेत. तसेच मांग २% असलेले दिसून येतात. नवबौध्द असलेले दलित यंत्रमागधारक नाहीत, असे दिसून येते. इतर दलितांना कसबी स्वरुपाचा पारंपारिक व्यवसाय असल्यामुळे ते पारंपारिक व्यवसाय करतात. त्यामुळे त्याचे प्रमाण कमी आहे.

दलित मालक जसे वेगवेगळया जातीचे आढळतात तसेच दलित यंत्रमागधारकांच्या कारखान्यात वेगवेगळया जातीचे कामगार काम करतांना दिसतात.

-/ तक्ता क्र. १० /-

-x कामगारांची जातीनिहाय टक्केवारी x-

| अ.नं. | जात | | कामगारांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | महार | .. | ४८% |
| २. | मांग | .. | ४% |
| ३. | चांभार | .. | ११% |
| ४. | ढोर | .. | ८% |
| ५. | नवबौध्द | .. | ४% |
| ६. | इतर जातीचे | .. | २५% |

तक्ता क्र.१० वरुन असे दिसून येते की, महार कामगारांची टक्केवारी ४८ असून ती सर्वाधिक आहे. त्याचे कारण महारांचा पारंपारिक व्यवसाय

करावी स्वरूपाचा नाही. त्यामुळे कामगारांचेही प्रमाण जास्त आहे. इतर जाती अजूनही पारंपारिक व्यवसायच करतात. त्यामुळे त्या जातीचे कामगार कमी आहेत. दलितेतर जातीचे कामगार २५% असलेले दिसतात. चांभार जातीचे ११% कामगार असून मांग व नवबोध्द यातील प्रत्येकी ४% कामगार आहेत.

दलित यंत्रमागधारकांचा संबंध दोन प्रकारच्या कामगारांशी येतो. १] दलित कामगार, २] इतर जातीचे कामगार.

या कामगारांना ते कोणत्या प्रकारची वागणूक देतात? दलित कामगारांना विशेष सवलती आहेत का ? की, सर्व कामगार सारखेच मानण्यात येतात. ? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केल्यानंतर, असे दिसते की, बहुसंख्य दलित मागधारकांनी आपल्या नातेवाईकांना व परिचितांना कामगार म्हणून कामावर ठेवले आहे. त्यांच्याशिवाय इतर दलित जातीचे कामगार व दलितेतर कामगार आहेत. त्यांच्यात कोणताच भेदभाव केला जात नाही. प्रत्येकाच्या कामानुसार त्याला वेतन मिळते. तसेच सर्वांना सारख्याच सोईसवलतींचा लाभ मिळतो.

आम्हाला मिळालेल्या माहितीवरून असे दिसून येते की,. दलित यंत्रमागधारकांना पेढीवाल्या व्यापा-यांकडून सुरुवातीला अस्पृश्यतेचा त्रास झाला. ते परंपरावादी असल्यामुळे पेढीवर गेल्यानंतर पाणीसुध्दा वरून वाढत असत. नंतरच्या काळात दलित यंत्रमागधारकांचा आर्थिक विकास होत गेला. तसतसे अस्पृश्यतेचे प्रमाण कमी होत गेले. म्हणजेच दलित यंत्रमागधारकांचे जीवन वेगवेगळे अनुभव घेऊन घडत गेले. आपल्या-सारखाच इतरांचाही विकास व्हावा यासाठी ते प्रयत्न करतांना दिसतात.

परंतु त्यामधील प्रत्येक जातीची वेगळी चूल मांडलेली दिसते.

यंत्रमाग व्यवसायात पेढीवाल्यांची मक्तेदारी प्रस्थापित झाली आहे. यातून दलित यंत्रमागधारकांची सुटका व्हावी या उद्देशाने मागासवर्गीय नेत्यांनी "वसंतराव नाईक मागासवर्गीय कापड उत्पादक संस्था, मर्यादित, इचलकरंजी" ही संस्था स्थापन केली आहे. या संस्थेचे सर्व सभासद दलित यंत्रमागधारक असून त्यांची संख्या ६५ इतकी आहे. परंतु ही संस्था सर्वच मागासवर्गीय यंत्रमागधारकांना सामाऊन घेऊ शकत नाही. कारण ज्या दलित नेत्यांनी ही संस्था स्थापन केली त्यांनी आपल्या जातीतील लोकांना प्राधान्य दिले आहेच, त्याबरोबर स्वतःचे दहा पेक्षा जास्त माग असतांना दोन मागाचे युनिट दाखवून त्यामध्ये आपले नांवही समाविष्ट केले आहे, असे दिसून येते. म्हणजेच ज्यांना गरज आहे. त्यांना फायदा मिळणार नाही, ज्यांना गरज नाही त्यांनाच या संस्थेकडून फायदा मिळेल.

मागासवर्गीयांची दुसरी संस्था म्हणजे, "सावित्रीबाई फुले मागासवर्गीय कापड उत्पादक सहकारी संस्था." या संस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे ही संस्था दलितेतर नेत्यांनी निर्माण केलेली आहे. या संस्थेचे ६० सभासद आहेत. दलित यंत्रमागधारकांना पेढीवाल्यासारख्या मध्यस्थांकडून होणा-या पिळवणुकीतून सोडवण्यासाठी ही संस्था स्थापन करण्यांत आली आहे.

यंत्रमागधंद्यातील अनुभवी लोकांच्या मते, त्या संस्था फार काळ टिकाव धरू शकणार नाहीत. कारण कायमपणे या संस्थांमध्ये सहकार्य असणार नाही. तसेच त्या यशस्वी करण्यासाठी असणारी चिकाटी या लोकांकडे नाही. तेजीच्या काळात रु १०,०००/- रुपये ॲडव्हान्स मागितले तर पेढीवाला देतो. त्याप्रमाणे त्या संस्था देऊ शकणार नाहीत. या

संस्थांना सभासदांच्या नांवावर कर्जही घेता येत नाही. कारण सभासदांनी आधीच कर्ज काढलेले असते. तसेच दलित मागधारकांमध्ये दलित नेत्यांबद्दल गैरसमज असल्यामुळे दलित मागधारक जास्त प्रमाणात या संस्थांबद्दल विश्वास बाळगत नाहीत.

दलित यंत्रमागधारकांना कर्ज देण्याची कोणतीही शासकीय योजना नाही. बँकाही सहजासहजी छोट्या यंत्रमागधारकांना कर्ज देत नाहीत. त्यामुळे छुप्या पद्धतीने सावकारीचा धंदा अनेक लोक करतांना दिसतात. या लोकांच्या व्याजाचा दर दरमहा ५% असतो. कर्ज काढून जर यंत्रमाग घातले असतील तर कर्जाचे व्याज नियमित द्यावे लागते. यामुळेच छोटे यंत्रमागधारक या उद्योगात फारशी प्रगती करू शकत नाहीत. यंत्रमाग-धारकांची पिळवणूक होतांना दिसते.

इचलकरंजीतील यंत्रमाग उद्योग विकेंद्रित स्वरूपाचा आहे. छोट्या यंत्रमागधारकावरच [दोन ते आठ माग] तो अवलंबून आहे. त्यांच्या उत्पादनाच्या बाजारपेठेसाठी ते त्रयस्थावर किंवा मध्यस्थावर अवलंबून आहेत. उत्पादकांकडून अंतीम उत्पादन प्रत्यक्षपणे विकले जात नाही. परंतु आर्थिक साधनामध्ये ज्याचा सहज शिरकाव होतो त्यामध्यस्थांमार्फत विकले जाते. ख-या उत्पादकांकडून मध्यस्थ कमी किमतीला कापड विकत घेतो. आणि त्याची विक्री जास्त फायदा घेऊन अंतीम ग्राहकाला करतो. मध्यस्थाला जो जास्त फायदा मिळतो, त्यात उत्पादकाचा वाटा नसतो. प्रत्यक्षात ते मध्यस्थाच्या दयेवर असतात. बेसुमार भाववाढीच्या परिस्थितीत लोभी व स्वार्थी मध्यस्थांकडून कापडाचे भाव वाढविले जातात. यंत्रमाग-धारकांचे "ना नफा ना तोटा" या आधारावर आणि करारबध्द मजूरीच्या आधारावर लुबाडणूक केली जाते.

--=0=--